**Aethel Research Digest Juncture: An International Journal** E-ISSN: 3139-1672
Vol. 2, Issue 2, March- April 2026
Received: 17/03/2026 Revised: 05/04/2026
Accepted: 16/04/2026 Published:05/05/2026
Aethel Research Digest Juncture
An International Journal

# खाजगी व सरकारी शिक्षणावरील खर्चाचा कौटुंबिक उत्पन्नाशी संबंध : एक अभ्यास

डॉ. दयानंद हाके
सहा-प्राध्यापक, अर्थशास्त्र वभाग, रामकृष्ण परमहंस महावद्यालय, धाराशव, जि. धाराशव, महाराष्ट्र-भारत Email- dayannadhake@gmail.com
https://doi.org/10.5281/zenodo.20035403

## सारांश

शक्षण हा मानवी वकासाचा पाया आहे, परंतु अलकडच्या काळात शक्षणाचे बाजारीकरण आण वाढता खर्च ही पालकांसाठी चंतेची बाब बनली आहे. मराठवाडा सारख्या वकसनशील क्षेत्रात पालकांच्या उत्पन्नाचा त्यांच्या मुलांच्या शैक्षणक गुणवत्तेवर आण शाळा निवडीवर (सरकारी की खाजगी) मोठा प्रभाव पडतो. सदरील अभ्यासामध्ये मराठवाड्यातील प्राथमक, माध्यमक व उच्च माध्यमक शक्षण स्तरांवरील खाजगी व सरकारी खर्चाचा कुटुंबाच्या उत्पन्नाशी असलेला संबंध तपासण्याचा प्रयत्न केलेला आहे.

हा अभ्यास अनुभवाधारित, वर्णनात्मक व वश्लेषणात्मक स्वरूपाचा आहे. या मध्ये १०० कुटुंबांची गुगल फोर्म च्या मदतीने माहिती गोळा केली आहे. तसेच दुय्यम माहिती सरकारी सरकारी अहवाल, शक्षण वभागाची आकडेवारी, संशोधन लेख इ. द्वारे माहिती गोळा केली आहे. याच्या आधारे कुटुंबाचे उत्पन्न आण शैक्षणक खर्च शक्षणावरील खर्च यांच्यात कोणताही महत्त्वपूर्ण संबंध आहे, हे तपासण्यासाठी सहसंबंध आण रेषीय प्रतिगमनाच्या मदतीने वश्लेषण करण्यात आले आहे. या अभ्यासातून स्पष्ट होते क कुटुंबाचे उत्पन्न आण शक्षणावरील खर्च यांचा खूप जवळचा साकारात्मान संबंध आहे. शासकीय शाळांच्या संख्येत घट होत असून खाजगी शाळांच्या संख्येत वाढ होत आहे. शक्षण क्षेत्रात खाजगीकरणाचा प्रभाव वाढत असल्याचे दिसून येते.

यामुळे समाजात वषमता वाढण्याची शक्यता आहे. यासाठी सरकारने उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यात प्रामुख्याने मोफत व सक्तीच्या शक्षणाचा हक्काची व्याप्ती वाढवणे, सरकारी शाळाच्या वकासास महत्व देणे, सरकारी इंग्रजी व सेमी-इंग्रजी शाळा उभा कराव्यात इत्यादी वर भर द्यावी असे हा अभ्यास स्पष्ट करते.

*(मुख्य शब्द: शैक्ष णक खर्च, शक्षण स्तर, कुटुंबाचे उत्पन्न, खाजगी शक्षण, शक्षणाचा हक्क, सामाजिक वषमता इ. )*

## १. प्रस्तावना

मानवाचा वकास व वस्तार हा पूर्णतः शक्षण व्यवस्थेवर अवलंबून आहे. शक्षण हा मानवी जीवनाचा एक अवभाज घटक आहे. प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगीण वकास पर्यायाने देशाचा व समाजाचा वकास हा शक्षण व्यवस्थेवर अवलंबून आहे. यावरून शक्षणाची व्यक्ती वकासात, सामाजिक वकासात व देश्याच्या आर्थक वकासात खूप महत्वाची भूमका आहे. आधुनिक अर्थशास्त्राच्या भाषेत सांगयचे झाले तर शक्षण हे मानवी भांडवल आहे. त्यामुळे कुशल, प्रशक्षत व सुशक्षत मनुष्यबळ हे आर्थक वकासाचे प्रमुख साधन आहे. कोणत्याही देशाची प्रगती ही त्या देशातील शक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तेवर अवलंबून असते.

भारतासारख्या वकसनशील देशात शक्षण क्षेत्रात गेल्या काही दशकांत लक्षणीय बदल झाले आहेत. २०२१-२२ च्या आकडेवारीनुसार भारतात १४.८९ लाख शाळा आहेत. यामध्ये सरकारी, निमसरकारी आण खाजगी शाळांचा समावेश होतो. जवळपास या शाळांमध्ये २४.८ कोटी पेक्ष्या अधक वध्यार्थी शक्षण घेत होतो. प्रामुख्याने प्राथमक, माध्यमक व उच्च माध्यमक स्तरावर खाजगी शाळांची संख्या झपाट्याने वाढलेली दिसून येते. २०२४ च्या आकडेवारी नुसार जवळपास ३.५ लाख खाजगी शाळांची संख्या आहे, जी गेल्या दशकात १५% वाढ दर्शवते. खाजगी शाळांचा वाढीचा वेग वचारात घेता, पालक आपल्या पाल्याच्या शक्षणावर मोठा खर्च करण्यास तयार आहे हे लक्षात येते. यामुळे शक्षणाच्या खर्चातही वाढ झालेले सद्ध होते. परंतु शक्षणाचा खर्च व कुटुंबाचे उत्पन याचा खूप जवळचा संबंध आहे. कुटुंबाचे उत्पन्न निचत करते क मुलांना

कोणत्या प्रकारचे शिक्षण देता येईल म्हणजे सरकारी शाळेतून की खाजगी शाळेतून, साधी शाळा की महागडी इंग्रजी माध्यमाची शाळा. त्यामुळे कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न आणि शिक्षणावरील होणारा खर्च यांचा अनुभवाधारित अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

सदरील अभ्यासामध्ये मराठवाड्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण स्तरांवरील खाजगी व सरकारी खर्चाचा कुटुंबाच्या उत्पन्नाशी असलेला संबंध तपासण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अभ्यासाची पार्श्वभूमी

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने शिक्षणाच्या विस्तारासाठी अनेक आयोग स्थापित केले. १९५२ मध्ये डॉ. ए. लक्ष्मणस्वामी मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली माध्यमिक शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाने माध्यमिक व उच्चमाध्यमिक अभ्यासक्रमांचे विविधीकरण आणि बहुउद्देशीय हायस्कूलची स्थापना करण्याचे सुचवण्यात आले. यानंतर डी.एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली १९६४ मध्ये भारतीय शिक्षण आयोगाची नियुक्ती करण्यात आली. या शैक्षणिक धोरणात भर दिला. मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, मध्यान्ह भोजन योजना, शिष्यवृत्ती योजना १४ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी मोफत आणि सक्तीचे शिक्षण यावर भर देण्यात आली. यानंतर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६, राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राबवण्यात आले. या धोरणात विशेषतः महिला, अनुसूचित जाती (SC) आणि जमाती (ST) यांच्यातील शैक्षणिक विषमता दूर करण्यावर भर देण्यात आला. आणि आत्ता २९ जुलै २०२० रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केले. या धोरणात रचनात्मक बदल, मातृभाषेतून शिक्षण, कौशल्य विकास आणि २०३० पर्यंत पूर्व-शालेय ते माध्यमिक स्थरापर्यंत १०० सकल नोंदणी प्रमाण साध्य करण्याचे उद्दीष्टे ठेवण्यात आली आणि भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवण्यावर भर देण्यात आला. यावरून लक्षात येते कि, भारतामध्ये शैक्षणिक विकास साधण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात आले. तरीसुद्धा शिक्षणातील गुणवत्ता, पायाभूत सुविधा व शिक्षकांची उपलब्धता याबाबत सरकारी शाळांवर

अनेकदा टीका केली जाते. आज अनेक सरकारी व निमसरकारी शाळा ओस पडलेल्या दिसून येत आहेत.

दुसरीकडे खाजगी शाळा अधक दर्जेदार शक्षण, इंग्रजी माध्यम, आधुनिक सुवधा व शस्त प्रदान करतात, असा एक समज पालकांचा होत चालला आहे. त्यामुळे मध्यम व उच्च उत्पन्न गटातील पालक आपल्या मुलांना खाजगी शाळांमध्ये ठेवणे पसंत करत आहेत. परंतु या शाळांचे शुल्क, वह्या-पुस्तके, गणवेश, वाहतूक, शकवणी यांसारख्या खर्चामुळे शक्षणाचा खर्च मोठ्या प्रमाणात पालकांवर वाढलेला दिसून येतो. यामुळे सदरील अभ्यासात प्राथमक, माध्यमक व उच्च माध्यमक स्तरावर शक्षण खर्च आण कुटुंबीय उत्पन्न यांचा संबंध स्पष्टपणे समजून घेण्यास मदत होतील.

समस्येचे वधान

खाजगी व सरकारी शाळांवरील खर्चात मोठी तफावत आढळते. प्राथमक, माध्यमक व उच्च माध्यमक शक्षण स्तरावर खाजगी शाळा आवा क सवा फीस अकारात आहेत. तरीही पालक तो खर्च करत आहेत. हा खर्च कुटुंबाच्या उत्पन्नाशी कतपत संबंधत आहे, तसेच कुटुंबाच्या उत्पन्न गटानुसार शक्षणाच्या निवडीत कोणते बदल दिसून येतात, याचा सखोल अनुभवाधारित अभ्यास झालेला कमी आढळतो. सदरील आभासाची आवशकता काय आहे. हे पुढील मुद्याद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

1. शक्षणावरील वाढता खर्च आण त्याचा कुटुंबीय अर्थसंकल्पावर होणारा परिणाम समजून घेणे
2. ववध उत्पन्न गटांतील कुटुंबांची शैक्षणक निवड स्पष्ट करणे
3. खाजगी व सरकारी शक्षणातील खर्चातील असमानता अभ्यासणे
4. शैक्षणक धोरणे ठरवण्यासाठी उपयुक्त निष्कर्ष उपलब्ध करून देणे.

## २. साहित्याचा आढावा:

जोआन शयाओलेई कयान आण रसेल स्मिथ (२०१०) यांनी शहरी चीनमधील शैक्षणक खर्च: उत्पन्नाचे परिणाम, कौटुंबिक वैशष्ट्ये आण देशांतर्गत व परदेशी शक्षणाची मागणी यावर अभ्यास केला. यांनी कौटुंबिक उत्पन्नाचा देशांतर्गत आण परदेशातील शैक्षणक खर्चाच्या प्रमाणावर महत्त्वपूर्ण परिणाम होतो. त्याच बरोबर ज्या कुटुंबांमध्ये मातांचे उच्च माध्यमक कंवा महावद्यालयीन शक्षण झाले आहे आण पालक व्यावसायिक पदांवर कार्यरत आहेत, अशी कुटुंबे आपल्या मुलांच्या शक्षणावर अधक खर्च करतात. व सर्वोच्च उत्पन्न गटात असणारे, महावद्यालयीन शक्षण घेतलेले पालक, पालक शासकीय अधकारी कंवा मध्यम-स्तरीय व्यावसायिक असतील तर या कुटुंबांनी आपल्या मुलांना शक्षणासाठी परदेशात पाठवण्याची शक्यता लक्षणीय वाढली आहे हे निष्कर्ष काढला आहे.

देशमुख (2018) यांनी उत्पन्नातील वाढ आण घरगुती शक्षण खर्च: भारतीय कुटुंबातील पुरावे याबाबत अभ्यास केला. त्यांच्या अभ्यासानुसार कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ झाल्यास शक्षणावरील खर्चात लक्षणीय वाढ होत असल्याचे दिसून येते, ज्यामुळे शक्षण हे उत्पन्नाशी सकारात्मकरीत्या संबंधत असल्याचे स्पष्ट होते.

पाटील (2020), यांनी भारतातील खाजगी आण सरकारी शाळामधील वार्षक खर्चाचे तुलनात्मक वश्लेषण हा शोधनिबंध लहिला. यांनी खाजगी व सरकारी शाळांतील खर्चाची तुलना करताना खाजगी शाळांमधील वार्षक खर्च सरकारी शाळांच्या तुलनेत अनेक पटींनी अधक असल्याचे नमूद केले आहे. तसेच NSSO च्या अहवालानुसार माध्यमक व उच्च माध्यमक स्तरावर शक्षणाचा आर्थक भार कुटुंबांवर सर्वाधक पडतो. या सर्व अभ्यासांवरून शक्षण खर्चातील असमानता व उत्पन्नाचा प्रभाव अधोरेखत होतो.

या सर्व अभ्यासांमधून उत्पन्न व शक्षण खर्च यांच्यामध्ये सकारात्मक संबंध आहे हे स्पष्ट होतो. परंतु प्राथमक ते उच्च माध्यमक स्तरावरील तुलनात्मक अनुभवाधारित अभ्यास कमी असल्याचे आढळते.

## ३. संशोधन पद्धती:

हा अभ्यास अनुभवाधारित, वर्णनात्मक व वश्लेषणात्मक स्वरूपाचा आहे. या मध्ये प्राथमक आण दुय्यम माहितीचे संग्रहण केले आहे. याच्या आधारावर सुशोधनाची उदिष्टे सध्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

या अभ्यासाची उद्दिष्टे खालील प्रमाणे सांगता येतील.

1. प्राथमक, माध्यमक व उच्च माध्यमक शक्षणावरील कुटुंबीय खर्चाचा अभ्यास करणे
2. खाजगी व सरकारी शाळांतील शक्षण खर्चाची तुलना करणे
3. कुटुंबीय उत्पन्न आण शक्षण खर्च यांतील संबंधाचे वश्लेषण करणे
4. ववध उत्पन्न गटांतील शक्षण खर्चातील फरक अभ्यासणे

संशोधन गृहितके

कुटुंबाचे उत्पन्न आण शक्षणावरील खर्च यामधील संबंध

- शून्य गृहितक **($H_0$):** कुटुंबाचे उत्पन्न आण शक्षणावरील खर्च यांच्यात कोणताही महत्त्वपूर्ण संबंध नाही.
- पर्यायी गृहितक **($H_1$):** कुटुंबाचे उत्पन्न आण शक्षणावरील खर्च यांच्यात महत्त्वपूर्ण सकारात्मक संबंध आहे.

माहितीचे संकलन : या अभ्यासात  प्राथमक तसेच दुय्यम माहितीचे संग्रहण करण्यात आले आहे. अनुभवाधारित अभ्यासासाठी १०० पालकांची गुगल फोर्म च्या मदतीने माहिती गोळा केली आहे. तसेच दुय्यम माहिती सरकारी  सरकारी अहवाल, शक्षण वभागाची आकडेवारी, संशोधन लेख इ. द्वारे माहिती गोळा केली आहे.

नमुना निवड: या अभ्यासात अर्धशहरी भागातील ४० व शहरी भागातील ६० पालकांची माहिती स्तरित यादृच्छिक नमुना पद्धतीद्वारे केली आहे.

वश्लेषण साधने: या अभ्यासात टक्केवारी, सरासरी, सहसंबंध वश्लेषण, ची-स्क्वेअर चाचणी इ. सांख्यिकी साधनाच्या मदतीने वष्लेषण करण्यात आले आहे.

## ४. माहिती वश्लेषण व अर्थबोधन:

खालीली दिल्येल्या तक्त्या मध्ये १०० पालकांची गुगल फोर्मच्या मदतीने गोळा केलेल्या माहितीचे वश्लेषण करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने कुटुंबाचे उत्पन्नानुसार वर्गीकरण, शक्षण स्तर व शाळा प्रकारानुसार सरासरी वार्षक खर्च व उत्पन्न गट व शाळा प्रकार यांतील संबंध याचे वश्लेषण करण्यात आले आहे. ते पुढील तक्ता ०१ मध्ये दर्शवला आहे.

तक्ता ०१: पालकांचे मते

| कुटुंबाचे उत्पन्नानुसार वर्गीकरण | | |
|---|---|---|
| उत्पन्न गट (मा सक ) | कुटुंबांची संख्या | टक्केवारी |
| ₹ 20,000 पर्यंत | 19 | 19% |
| ₹20,001 - ₹50,000 | 45 | 45% |
| ₹50,000 पेक्षा जास्त | 36 | 36% |
| एकूण | १०० | **100%** |
| शक्षण स्तर व शाळा प्रकारानुसार सरासरी वा षक खर्च ( ) | | |
| शक्षण स्तर | सरकारी शाळा | खाजगी शाळा |
| प्राथमक | 4,000 (13.79%) | 25,000 (86.21%) |
| माध्यमक | 6,000 (14.63%) | 35,000 (85.67% |
| उच्च माध्यमक | 9,000 (13.04%) | 60,000 (86.97%) |
| उत्पन्न गट व शाळा प्रकार यांतील संबंध (%) | | |
| उत्पन्न गट | सरकारी शाळा (%) | खाजगी शाळा (%) |
| कमी उत्पन्न | 92 | 8 |
| मध्यम उत्पन्न | 35 | 65 |
| उच्च उत्पन्न | 02 | 98 |
| सहसंबंध वश्लेषण | r = -0.99 | r = 0.99 |

१. कुटुंबाचे उत्पन्न:

वरील तक्त्यानुसार बहुसंख्य कुटुंबे कमी (१९%) व मध्यम उत्पन्न (४५%) गटातील आहेत. त्यामुळे या कुटुंबावर शक्षण खर्चाचा आर्थक भार या गटांवर जास्त पडतो. उच्च उत्पन्न

गटावर शिक्षण खर्चाचा कमी भर पडतो. यामुळे या गटातील कुटुंब खाजगी शाळांना प्राधान्य देतात.

२. शिक्षण स्तर व शाळा प्रकारानुसार सरासरी वा र्षिक खर्च:

प्रत्येक शिक्षण स्तरावर खाजगी शाळांवरील खर्च सरकारी शाळांपेक्षा ८५% च्या वर आहे. यावरून स्पष्ट होतील क, खाजगी शाळांचा सरासरी वार्षिक खर्च खूप जास्त आहे.

३. उत्पन्न गट व शाळा प्रकार यांतील संबंध:

वरील आकडेवारी नुसार, कमी उत्पन्न गटातील (९२% ) पालक सरकारी शाळेमध्ये आपल्या पाल्याला शिक्षण देण्यास प्राधन्य देतात. तर मध्यम व उच्च उत्पन्न गटातील पालक खाजगी शाळांना पसंती देतात. यावरून सांगता येतील क, उत्पन्न वाढत गेल्यास खाजगी शाळांची निवड वाढते, तर कमी उत्पन्न गट सरकारी शिक्षणावर अधिक अवलंबून असतो.

४. संशोधन ग्रहीताकांचे विश्लेषण:


कुटुंबाचे उत्पन्न आणि शिक्षणावरील खर्च (खाजगी शाळेतील प्रवेशाचे प्रमाण) यांच्यातील संबंध तपासण्यासाठी पुढील गृहितके मांडण्यात आलेली आहेत.

**$H_0$** (शून्य गृहितक): कुटुंबाचे उत्पन्न आणि शिक्षणावरील खर्च यांच्यात कोणताही महत्त्वपूर्ण संबंध नाही.

**$H_1$** (पर्यायी गृहितक): कुटुंबाचे उत्पन्न आणि शिक्षणावरील खर्च यांच्यात महत्त्वपूर्ण सकारात्मक संबंध आहे.

उत्पन्न गट (कमी = 1, मध्यम = 2, उच्च = 3) आणि खाजगी शिक्षणावरील खर्च यांवर आधारित सहसंबंध विश्लेषण करण्यात आले. त्यानुसार सहसंबंध गुणांक **$r = 0.99$** असा आहे. यावरून लक्ष्यात येते क, उत्पन्न गट आणि खाजगी शिक्षणावरील खर्च याच्यात अत्यंत उच्च सकारात्मक सहसंबंध दर्शवतो.

तसेच साधी रेषीय प्रतिगमन (Simple Linear Regression) विश्लेषण करण्यात आले. त्यातून पुढील प्रतिगमन समीकरण प्राप्त झाले:




**Y = −33+45X**

येथे,

X = उत्पन्नगट

Y = खाजगी खर्च

प्रतिगमन गुणांक (**b = 45**) सकारात्मक असून, उत्पन्न गटात प्रत्येक एकक वाढ झाल्यास खाजगी शाळेतील प्रवेश सुमारे 45 टक्क्यांनी वाढतो, असे सूचत होते. वरील आलेखावरून लक्ष्यात येते क रेषीय प्रतिगमन खालून वारी एका सरळ रेशेत वारी चढत आहे. यावरून यांच्यात सकारात्मक संबंध आहे असे स्पष्ट होते.

सहसंबंध गुणांक (**r = 0.99**) अत्यंत उच्च सकारात्मक असल्यामुळे शून्य गृहितक ($H_0$) नाकारण्यात येते व पर्यायी गृहितक ($H_1$) स्वीकारण्यात येते. यावरून असे निष्पन्न होते की कुटुंबाचे उत्पन्न आण शक्षणावरील खर्च यांच्यात लक्षणीय सकारात्मक संबंध आहे. उत्पन्न वाढल्यास खाजगी शक्षणावरील खर्चात वाढ होत असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

५. महाराष्ट्रातील शाळेतील संख्येत झालेली वाढ व घट

तक्ता ०२: महाराष्ट्रातील शाळांची वाढ व घट

| शाळांची श्रेणी | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | वाढ/घट (२२-२३ ते २३-२४) | वाढ/घट (२३-२४ ते २४-२५) |
|---|---|---|---|---|---|
| शासकीय आ ण स्थानिक संस्था | ६५,४३१ | ६५,०६४ | ६४,७९१ | -०.५६% (घट) | -०.४२% (घट) |
| खाजगी अनुदानित | २३,९४८ | २४,१५२ | २४,३७८ | +०.८५% (वाढ) | +०.९४% (वाढ) |
| खाजगी वनाअनुदानित | १९,०७२ | ४,०७७ | ३,७७० | -७८.६२% * | -७.५३% (घट) |
| स्वयं अर्थसहाय्यित | १४,६७९ | १४,८५१ | १५,२१८ | +१.१७% (वाढ) | +२.४७% (वाढ) |
| एकूण | १,०८,४५१ | १,०८,१४४ | १,०८,१५७ | -०.२८% (घट) | +०.०१% (वाढ) |

*(संदर्भ: युडायस अहवाल २०२३, २०२४ आ ण २०२५)*

तक्ता ०२ मध्ये मागील ०३ वर्षात शाळेच्या संख्येतील वाढ व घट दर्शवली आहे. त्याचे अर्थबोधन पुढील प्रमाणे सांगता येतील.

- शासकीय आ ण स्थानिक संस्थांच्या शाळांमध्ये दरवर्षी सरासरी ०.५% इतकी घट दिसून येत आहे.
- खाजगी अनुदानित शाळांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे (सुमारे ०.९% दरवर्षी).
- स्वयं-अर्थसहाय्यित शाळांचा वाढीचा दर सर्वात जास्त आहे. २०२३-२४ ते २०२४-२५ दरम्यान या शाळांमध्ये २.४७% इतकी मोठी वाढ नोंदवण्यात आली आहे. हे पालकांचा खाजगी आ ण स्वयं-अर्थसहाय्यित शाळांकडे असलेला वाढता कल दर्शवते.
- २०२२-२३ (१९,०७२) ते २०२३-२४ (४,०७७) दरम्यान या श्रेणीतील शाळांमध्ये मोठी घट झालेली दिसून येते.
- एकूण शाळांची संख्या १.०८ लाखांच्या आसपास स्थिर आहे. २०२२-२३ च्या तुलनेत २०२४-२५ मध्ये एकूण शाळांची संख्या थोड्या प्रमाणात कमी झाली आहे, परंतु २०२३-२४ च्या तुलनेत

२०२४-२५ मध्ये ०.०१% अशी नाममात्र वाढ झाली आहे.

तक्ता ०२ वरील आकड्यावरून पहिले तर, शासकीय शाळांच्या संख्येत घट होत असून खाजगी शाळांच्या संख्येत वाढ होत आहे. शक्षण क्षेत्रात खाजगीकरणाचा प्रभाव वाढत असल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट होते.

## ५. निष्कर्ष, सूचना आ ण सारांश

अ) महत्वाचे निष्कर्ष:

या अभ्यासात मराठवाड्यातील प्राथमक, माध्यमक व उच्च माध्यमक शक्षणावरील खाजगी व सरकारी खर्चाचा कौटुंबिक उत्पन्नाशी संबंध शोधण्यासाठी १०० पालकांचे मत घेण्यात आले. त्याद्वारे अभ्यासाचे खालीली निष्कर्ष सांगता येतील.

१. १९% पालक कमी उत्पन्न गट, ४५% पालक उच्च उत्पन्न गट आ ण ३६% उच्च उत्पन्न गटातील आहेत.

२. सरकारी शाळांपेक्ष्य खाजगी शाळांचा सरासरी वा र्षक खर्च खूप अ धक आहे. तसेच शक्षणाचा स्थर वाढल्यास शक्षणाचा खर्च वाढतो.

३. उत्पन्न वाढल्यास खाजगी शक्षणाची पसंती वाढते.

४. खाजगी शक्षणामुळे शक्षणक खर्चाचा भार कुटुंबावर पडतो.

५. कुटुंबाचे उत्पन्न आ ण शक्षणावरील खर्च यांच्यात महत्त्वपूर्ण सकारात्मक संबंध आहे.

६. सर्व स्थरावरील खाजगी शक्षण आर्थकदृष्ट्या सर्वाधक खर्चक आहे.

७. सरकारी शाळांच्या संख्येत घट झाली आहे.

आ) सूचना:

१. मोफत व सक्तीच्या शक्षणाचा हक्काची व्याप्ती वाढवणे: आर. टी. ई चा हक्क फक्त ६ ते १४ वर्ष वयोगटातील मुलांच्या शक्षणासाठी आहे. याची व्याप्ती ६ ते १८ वर्ष वयोगटापर्यंत वाढवी. जामुळे कमी उत्पन्न गटातील कुटुंबाना याचा अ धक फयदा घेता येतील.

२. सरकारी शाळाच्या वकासास महत्व देणे: या अभ्यासात स्पष्ट झाले आहे क, पालक खाजगी शाळांचा प्राधान्य देतात. या वरुद्ध सरकारी शाळांकडे पाट फरवत आहेत. याचे मुख्य कारण अद्यावत सोई-सुवधाचा अभाव, पायाभूत सुवधांचा अभाव, आधुनिकीकरणाचा अभाव इ. अनेक करणे आहेत. सरकार सध्या जीडीपीच्या फक्त २% ते ३% खर्च शक्षणावर करत आहे. सरकारने शाळा वकास कार्यकम हाती घेऊन, शक्षणक खर्च ६% च्या वर करावा.

३. सरकारी इंग्रजी व सेमी-इंग्रजी शाळा उभा कराव्यात: सरकारने मातृभाषेतील शक्षणाच्या शाळेमध्ये इंग्रजी व सेमी- इंग्रजी शाळाची उभारणी करावी. जेणे करून कमी उत्पन्न गटातील कुटुंबाना उच्च दर्जेचे शक्षण मळेल.

४. सरकारने आर. टी. ई कायद्याची ची कठोर अंमलबजावणी करावी.

५. सरकारी शाळांना जास्तीचे अनुदान देऊन गुणवत्ता वाढण्यास मदत करावी.

## सारांश:

या अभ्यासातून स्पष्ट होते की कुटुंबीय उत्पन्न आण प्राथमक, माध्यमक व उच्च माध्यमक शक्षणावरील खर्च यांच्यात मजबूत व सकारात्मक संबंध आहे. शक्षणक खर्चाचा भार कुटुंबावर खूप पडत आहे. भवष्यात अशीच परिस्तिथी राहिल्यास सामाजिक वषमता वाढू शकते. त्यामुळे गुणवत्तापूर्ण व परवडणारे सरकारी शक्षण उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे.

## संदर्भसूची

1. Qian, Joanne Xiaolei, and Russell Smyth. "Educational expenditure in urban China: Income effects, family characteristics and the demand for domestic and overseas education." *Applied Economics* 43.24 (2011): 3379-3394.

2. Deshmukh, A. (2018). *Income Growth and Household Education Expenditure: Evidence from Indian Households*. Journal of Education Economics, 12(3), 45-59.
3. Panda, Sitakanta. "Farmer education and household agricultural income in rural India." *International Journal of Social Economics* 42.6 (2015): 514-529.
4. Patil, S. (2020). *Comparative Analysis of Annual Educational Costs in Private and Public Schools in India*. International Journal of Educational Finance and Policy, 8(2), 78-94.
5. Sheikh, Younis Ahmad. "Higher education in India: Challenges and opportunities." *Journal of Education and Practice* 8.1 (2017): 39-42.